# जिल्ह्यात महायुतीची त्सुनामी, प्रस्थापितांचे पानीपत !

## बच्चु कडू, यशोमती ठाकुर, राजकुमार पटेलसह देवेंद्र भुयारांचाही पराभव

### दर्यापूराने महाविकास आघाडी ची लाज राखली

### रवी राणांचा 'गेम प्लॅन' यशस्वी

### अमरावतीमधून सुलभा खोडके पुन्हा आमदार





*महासागर प्रतिनिधी*

***अमरावती, ( दि.23 )- विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीचे शनिवारी( दि.23 ) धक्कादायक निकाल हाती आले. अमरावती जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या त्सुनामीने प्रस्थापितांचे पानीपत करत जिल्ह्यात 'कमळ' फुलविला. आ.रवी राणांनी बडनेरा मतदासंघाचा स्वतःचा गड राखत जिल्हाभर आखलेला 'गेम प्लॅन' ही यशस्वी केला.***

प्रस्थापित बच्चू कडू, यशोमती ठाकुर, राजकुमार पटेल, देवेंद्र भूयार हे पराभूत होवून त्यांच्या ठिकाणी भाजपचे आमदार निवडूण आले. दर्यापूरात मात्र महाविकास आघाडीकडून शिवसेना (उबाठा) उमेदवार गजानन लवटे यांनी विजय प्राप्त केल्याने तेवढी लाज राखल्या गेली.

निवडणूकीची तारीख घोषीत झाल्यापासून महाविकास आघाडी की, महायुती अशी काट्याची टक्कर दोन्ही आघाड्यांमध्ये सुरु होती. दोन्ही बाजुने कमालीचे शक्तीप्रदर्शन करण्यात आले. महायुतीमधील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांनी 'लाडकी बहिण' या योजनेसह आपल्या डझनभर योजनांचे मोठ्या प्रमाणात प्रदर्शन केले. दुसरीकडे युपी चे मुख्यमंत्री योगी आदीत्य नाथांचा 'बटेंगे तो कटेंगे' हा मुद्दाही चांगलाच प्रभावी ठरल्याचे दिसून आला.

| मतदारसंघ | विजयी उमेदवार | पक्ष | प्राप्त मतं |
|---|---|---|---|
| बडनेरा | रवी राणा | यु.स्वा.पक्ष( महायुती) | 127800 |
| अमरावती | सुलभा खोडके | राष्ट्रवादी( महायुती) | 60087 |
| अचलपूर | प्रविण तायडे | भाजपा( महायुती) | 78201 |
| मेळघाट | केवलराम काळे | भाजपा( महायुती) | 145978 |
| मोर्शी | उमेश यावलकर | भाजपा( महायुती) | 99200 |
| तिवसा | राजेश वानखडे | भाजपा( महायुती) | 99099 |
| धामणगाव रेल्वे | प्रताप अडसड | भाजपा( महायुती) | 110641 |
| दर्यापूर | गजानन लेवटे | शिवसेना( उबाठा) | 86296 |

| मतदारसंघ | पराभूत उमेदवार( व्दितीय क्रमांक ) | पक्ष | मतं |
|---|---|---|---|
| बडनेरा | प्रिती बंड | अपक्ष | 60099 |
| अमरावती | डॉ.सुनिल देशमुख | काँग्रेस | 54674 |
| अचलपूर | बच्चु कडू | काँग्रेस | 66070 |
| मेळघाट | डॉ.हेमंत चिमोटे | काँग्रेस | 39119 |
| मोर्शी | देवेंद्र भूयार | राष्ट्रवादी( महायुती) | 34695 |
| तिवसा | यशोमती ठाकूर | काँग्रेस | 92047 |
| धामणगाव रेल्वे | विरेंद्र जगताप | काँग्रेस | 94413 |
| दर्यापूर | रमेश बुंदिले | यु.स्वा.पक्ष | 67661 |

### जिल्ह्यात भाजपा 1 वरुन 5 वर

गेल्या पंचवार्षिकमध्ये धामणगाव मतदारसंघ वगळता इतर कोठेही भारतीय जनता पक्षाचे आमदार नव्हते. मात्र या निवडणूकीत ही संख्या एक वरुन पाच वर गेली. या निवडणूकीत धामणगाव मतदारसंघातील विद्यमान प्रताप अडसड यांच्यासह अचलपूर येथे प्रविण तायडे, मेळघाटमध्ये केवलराम काळे, वरुड येथे उमेश यावलकर, तिवसा येथे राजेश वानखडे यांच्या रुपाने भाजपचे पाच आमदार निवडून आले.

### जनतेचा निर्णय सन्मान्य आहे!

2024 च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने मला मूल्यवान मत दिले, आपल्या सर्वांचा मनापासून आभार व्यक्त करते. जनतेचा निर्णय सन्मान्य आहे, आणि आपण दिलेला मतदान हा आपल्या लोकशाहीतला एक महत्त्वपूर्ण हक्क आहे, जो प्रत्येक नागरिकाने पारदर्शकपणे व जबाबदारीने वापरला हे महत्त्वाचे आहे. तिवसा विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक मतदाराने या निवडणुकीत आपला सक्रिय सहभाग दिला, हे आम्हाला समजून आणि जाणून आम्हाला एक प्रेरणा मिळाली आहे. निवडणुकीच्या या प्रवासात आपल्याला अनेक गोष्टी शिकता आल्या आहेत आणि आपले समाधान व अपेक्षांचे अधिक नीट समजून घेण्याची संधी मिळाली आहे. जरी या निवडणुकीत पराभव झाला असला तरी, आपल्या पाठिंब्यामुळे आम्ही या क्षेत्राच्या विकासासाठी आणि लोककल्याणासाठी अधिक जोमाने प्रयत्न करू. तिवसा मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाची समस्या आणि अपेक्षांचा आम्हाला आदर आहे, आणि त्या समस्यांचा योग्य निराकरण करण्यासाठी आम्ही सदैव तयार राहू. आपल्या समर्पणासाठी, आपली एकजूट आणि आपला विश्वास हेच आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. आमच्या पराभवाने आपल्यावर कोणतीही नकारात्मक छाप सोडू नये, त्याऐवजी आपल्याशी अधिक चांगले संवाद साधून, आपल्या सर्वांच्या हितासाठी काम करण्याची प्रेरणा मिळवूया. पुढील सर्व सामाजिक कार्यात आपले सहकार्य अपेक्षित आहे!

**यशोमती ठाकुर, माजी आमदार तिवसा मतदारसंघ.**



भाजपाच्या प्रविण तायडे यांचे अभिनंदन करत, मी माझा पराभव स्विकार करतो. तसेच देशातील व राज्यातील सत्ताधाऱ्यांनी, इ.व्ही.एम.चा खेला करून लोकशाहीचा गळा घोटला. याचा निषेध करतो. लवकरच भाजपच्या या ईव्हीएम हॅगच्या खेळा विरोधात, मी जन आंदोलन करणार आहे.



**बच्चू कडू,**
**माजी आमदार,अचलपूर.**

# तीन दशकानंतर अचलपुरात कमळ फुलले

*बादल डकरे*

***चांदूर बाजार,( दि.23 ) - मागील दोन दशकांपासून एका हाती सत्ता मिळविणारे अचलपूरचे विद्यमान आमदार तथा परिवर्तन महाशक्ती चे प्रमुख नेते बच्चू कडू यांनी अचलपूर मतदारसंघात पाचव्यांदा आपली उमेदवारी दाखल केली होती. मात्र त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. भाजपकडून देण्यात आलेले उमेदवार प्रवीण तायडे यांना विरोधक पहिल्या दिवसापासून डमी संबोधत होते. मतदारसंघात तशी हवासुध्दा तयार करण्यात आली होती. मात्र उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश चे मुख्यमंत्री यांच्या सभेनंतर मतदार संघातील चित्र अचानक पालटले आणि डमी म्हणविणाऱ्या उमेदवारानेच बाजी मारत विजयश्री खेचून आणला.***

### बच्चू कडू यांचा पराभव

### प्रवीण तायडे यांच्या विजयाची घोडदौड



अचलपूर मतदार संघात जवळपास सहा वेळा अपक्ष उमेदवार निवडून आले आहे. मात्र पारंपारिक हा मतदारसंघ भारतीय जनता पक्षाचा गड असल्याचे सांगितले जात होते. तीन दशकापासून भारतीय जनता पक्षाला या मतदारसंघात यश प्राप्त करता आले नाही. स्वर्गीय विनायकराव कोरडे यांच्यानंतर 2014 च्या मोदी लाटेत अशोकराव बनसोड यांना 'कमळ' हे चिन्ह मिळाले होते. मात्र त्या ठिकाणी देखील बच्चू कडू यांनी त्यांचा अल्पशा त्याने पराभव केला होता. त्यानंतर मतदार संघात 2024 च्या निवडणुकीत प्रवीण तायडे यांना 'कमळ' चिन्ह देऊन निवडणूक रिंगणात उतरविले गेले. या सर्व निवडणुकीची जबाबदारी माजी लोकसभा खासदार नवनीत राणा, भाजपचे जिल्हाप्रमुख आणि राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी आपल्या हाती घेत मतदार संघात प्रचार केला. निवडणूक जिंकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केलेल्या प्रयत्नामूळे त्यांना यश मिळाले. या यशामध्ये सर्वात जास्त परिश्रम हे भाजपच्या पदाधिकाऱ्यांना करावे लागले. कारण चार वेळा आमदार असलेल्या उमेदवाराच्या विरोधात निवडणूक लढवणे काही सोपे नव्हते.

या निवडणूक मध्ये प्रवीण तायडे यांना 78201 इतके तर बच्चू कडू यांना 66070 इतके मत मिळाले. 2019 च्या निवडणूक मध्ये कडू यांना 83 हजार मत मिळाली होती, यावेळी मात्र त्याचे मतदान कमी झाल्याचे दिसून आले होते. त्याच बरोबर राष्ट्रीय कॉंग्रेस चे उमेदवार बबलू देशमुख यांना 62791 इतके मतदान झाले. भाजपला या दोघांचे मत आपल्या ताब्यात घेण्यात यश आले. आणि प्रविण तायडे यांचा 12,731 मतांनी विजय झाला. निवडणूक निकाल मध्ये भाजप उमेदवार हे सुरुवात पासूनच आघाडीवर होते.

### बच्चू कडू यांच्या पराभव ची कारणे

- परिवर्तन महाशक्ती म्हणून तिसरी आघाडी तयार केली. राज्यात उमेदवार दिले. इतर उमेदवाराच्या प्रचारात असल्याने त्यांच्या स्वतःच्या प्रचाराकडे दुर्लक्ष झाले असावे.
- महाविकास आघाडीमध्ये राज्यमंत्री असतानाही ते सरकारमधून बाहेर पडत गुवाहाटीला गेले. त्यामुळे मतदार यांच्या नाराजी चा सूर पाहायला मिळाला.
- लोकसभा निवडणुकीत दिनेश बुब याना उमेदवारी दिल्यामुळे भाजप उमेदवार नवनीत राणा याचा पराभव झाला. या पराभवाच्या बदल्यात त्यांना मतांची आकडेवारी कमी मिळाली.
- ग्रामीण भागात गाव पातळीवर कार्यकर्ते यांच्यामुळे अनेक मतभेद तयार झाले होते.
- विधानसभा निवडणूक दरम्यान पक्षातील होणारे पक्ष प्रवेश.
- कार्यकर्त्यांचा अति उत्साह यावेळी त्याच्या अंगलट आला.

### प्रवीण तायडे यांच्या विजयाची कारणे

- अचलपूर मतदारसंघात पाटील समाजाचे मोठया प्रमाणावर मतदान आहे याचा फायदा त्यांना झाला.
- लोकसभा निवडणुकीत थेट बच्चूकडू यांच्यावर टीका तसेच त्याच्या विरोधात अनेक आंदोलन.
- 'बटेंगे तो कंटेंगे' या उत्तर प्रदेश मुख्यमंत्री आणि मध्यप्रदेश मुख्यमंत्री याची प्रचार सभा, हिंदुत्व म्हणून पक्ष कडून चेहरा समोर करण्यात आला.
- लाडकी बहीण योजना, बसमध्ये वृद्धांना मोफत सवलत, महिला 50 प्रवास शुल्क माफी या गोष्टीमुळे महिलांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केले.
- भाजप कडून यावेळी जुन्या चेहऱ्यांना मागे ठेवत प्रवीण तायडे यांना उमेदवारी दिली त्याचा फायदा त्यांना झाला.
- प्रचार मध्ये कमालीची गुप्तता तसेच मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांची मेहनत.

### बच्चु कडू प्रचारात कमी पडले ?

माजी राज्यमंत्री वसुधा देशमुख यांच्या सन 2004 च्या निवडणुकीत दरम्यान त्यांच्या पक्षात मोठ्या प्रमाणावर पक्ष प्रवेश पहायला मिळाला होते. त्यावेळी त्यांनी देखील आमदार बच्चू कडू यांच्याप्रमाणेच मतदार संघात अनेक विकासात्मक कामे केली होती. त्यावेळी आपला पराभव नक्की असल्याचे आमदार बच्चू कडू यांना वाटत होते. मात्र त्यांनी गाफील न राहता मोठ्या प्रमाणावर प्रचार प्रसार मतदारांची भेट घेतली आणि बच्चू कडू यांचा विजय झाला. तीच परिस्थिती आज सन 2024 च्या निकालानंतर पहायला मिळत आहे.

## जिल्ह्यातून केवलराम काळे यांना रेकॉर्ड ब्रेक मतं

### 1 लाख 6 हजार 859 मतांनी मिळविला विजय



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.23 )-** मेळघाट विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार केवलराम काळे यांनी आदिवासी भागातील राजकारणात ऐतिहासिक विजयाची नोंद करीत एक नविन इतिहास घडविला आहे. लाडकी बहीण योजनेमुळे आदिवासी भागातील मतदारांनी प्रामाणिक छवी असलेल्या आ. काळे यांना जनतेने भरघोस प्रतिसाद देत 1 लाख 45 हजार 978 मतांनी निवडणूक दिले. आतापर्यंतच्या सर्व निवडणूकीच्या निकालाचे सर्व रेकॉर्ड केवलराम काळे यांनी तोंडले आहे.

गेल्या 2019 मधील विधानसभा निवडणुकीत मेळघाटाचे विद्यमान आमदार राजकुमार पटेल यांनी हे विदर्भात सर्वाधिक मतांनी निवडून आले होते. राज्यातील सर्वाधिक मतांनी निवडून येण्याचा मान बिड मतदार संघातुन महायुतीचे उमेदवार मा. धनजंय मुंडे हे 1 लाख चाळीस हजाराने तर केवल काळे हे 1 लाख 6 हजार 859 मते घेऊन राज्यातुन दुसरा, तर विदर्भातून पहिल्या क्रमांकावर निवडून येण्याचा मान मिळविला आहे. 26 व्या फेरीनंतर काळे यांना विजयी घोषित करण्यात आले. मेळघाटातील आदिवासी नागरिकांनी केवलराम काळे यांना मताधिक्य देऊन आमदार केले. यामागे भाजपा व शिंदे गटाच्या लाडकी बहिणीचे मोठे फॅक्टर आहे. कारण गोरगरिब आदिवासी महिलांना लाडकी बहिण योजनेतील 1500 रुपये चांगलेच फायदेशिर ठरले आहे. त्यामुळे आदिवासी नागरिकांकडून भाजपाचे उमेदवार केवलराम काळे यांना मताधिक्य कमी पडू दिले नाही.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

### 38-अमरावती

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| 1. | मेघा ज्ञानेश्वर तायडे | बहुजन समाज पार्टी | 1167 |
| 2. | पप्पु उर्फ मंगेश मधुकरराव पाटील | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | 2545 |
| 3. | डॉ. सुनिल पंजाबराव देशमुख | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | 54674 |
| 4. | सूलभा संजय खोडके (विजयी) | नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी | 60087 |
| 5. | डॉ. अबरार | प्रहर जनशक्ती पार्टी | 416 |
| 6. | अलीम पटेल मो. वहीम | आझाद समाज पार्टी (कांशीराम) | 54591 |
| 7. | अविनाश धनवटे | पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) | 295 |
| 8. | ईफान खान उस्मान खान | इंडियन युनियन मुस्लिम लीग | 796 |
| 9. | दिगांबर वामन भगत | जन जनवादी पार्टी | 154 |
| 10. | मेराजुनिस्सा अब्दुल शकील | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) | 116 |
| 11. | राहूल लिलाधर मेश्राम | वंचित बहूजन आघाडी | 3048 |
| 12. | अनुष्का विजय बेलोरकर | अपक्ष | 507 |
| 13. | जगदीश गुप्ता | अपक्ष | 34067 |
| 14. | पुरषोत्तम कीसन बागडी | अपक्ष | 321 |
| 15. | मोहम्मद निसार मोहम्मद युसुफ | अपक्ष | 66 |
| 16. | रामकृष्ण अडकूजी महाजन | अपक्ष | 387 |
| 17. | रितेश रमेश तेलमोरे | अपक्ष | 144 |
| 18. | विकेश गोकूलराव गवाले | अपक्ष | 139 |
| 19. | विजय मा. ढाकुलकर | अपक्ष | 396 |
| 20. | शेख युसूफ शेख हुसेन | अपक्ष | 191 |
| 21. | शेख रहमत इनायत | अपक्ष | 108 |
| 22. | हेमंत नंदकिशोरराव वाटाने | अपक्ष | 187 |

| | | | |
|---|---|---|---|
| नोटा | 856 | अंतिम मतदार-374458 | |
| एकूण | 215258 | पुरूष मतदार-188426 | |
| अवैध मते | 198 | स्त्री मतदार-186005 | |
| टेंडर व्होसट | 33 | इतर मतदार-27 | |

### 37-बडनेरा

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| 1. | सुनिल बलदेवराव खराटे | शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) | 7121 |
| 2. | रमेश पांडुरंग नागदिवे | बहुजन समाज पार्टी | 3502 |
| 3. | उत्तम किसनराव तिरपुडे | पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॉटिक) | 400 |
| 4. | रवि गंगाधर राणा | राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टी | 127800 |
| 5. | राहुल लक्ष्मणराव मोहोड | भारतीय युवा जन एकता पार्टी | 574 |
| 6. | लिना घनश्याम ढोले | वंचित बहुजन आघाडी | 1672 |
| 7. | श्रीकांत बाबुरावजी फुलसावंदे | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) | 50 |
| 8. | सोनाली संजय मेश्राम | ओपन पीपल्स पार्टी | 103 |
| 9. | अजय भोजराज मंडपे | अपक्ष | 55 |
| 10. | नितीन बाबाराव कदम | अपक्ष | 650 |
| 11. | किरण कचरुआप्पा यमगवळी | अपक्ष | 293 |
| 12. | कैलाश वसंतराव रोडगे | अपक्ष | 144 |
| 13. | गिरीश हरिदास बारबुध्दे | अपक्ष | 1293 |
| 14. | तुषार पंडितराव भारतीय | अपक्ष | 3337 |
| 15. | तुषार राजेंद्र पवार | अपक्ष | 137 |
| 16. | प्रशांत पंजाबराव जाधव | अपक्ष | 1309 |
| 17. | प्रिती संजय बंड | अपक्ष | 60826 |
| 18. | मुन्ना नारायणसिंग राठोड | अपक्ष | 241 |
| 19. | योगेश सुभाषराव कंटाळे | अपक्ष | 363 |
| 20. | राहूल नाना काजळे | अपक्ष | 1134 |
| 21. | राहूल प्रकाश श्रृंगारे | अपक्ष | 408 |
| 22. | रंजाना धनराज डोंगरे/धनपाल | अपक्ष | 68 |
| 23. | विजय मनोहर श्रीवास | अपक्ष | 48 |
| 24. | श्रीधर वासुदेव खडसे | अपक्ष | 119 |
| 25. | सचिन विनोदराव डहाके | अपक्ष | 49 |
| 26. | सुरेश पुंडलीकराव मेश्राम | अपक्ष | 113 |

| | | | |
|---|---|---|---|
| नोटा | 692 | अंतिम मतदार-363825 | |
| एकूण | 212501 | पुरूष मतदार-183009 | |
| अवैध वोट | 0 | स्त्री मतदार-180771 | |
| टेंडर वोट | 5 | इतर मतदार-45 | |

### 39-तिवसा विधानसभा मतदार संघ

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. मुकुंद यशवंत ढोणे | बहुजन समाज पार्टी | 1073 |
| 2. | ॲड. यशोमती चंद्रकांत ठाकूर | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | 92047 |
| 3. | राजेश श्रीरामजी वानखडे (विजयी) | भारतीय जनता पार्टी | 99664 |
| 4. | इंजी. अविनाश धनवटे | पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) | 555 |
| 5. | प्रदिप गंगाधर महाजन देश | जनहित पार्टी | 144 |
| 6. | मिलींद श्रीरामजी तायडे | वंचित बहुजन आघाडी | 6710 |
| 7. | शिल्पा नरेंद्र कठाणे | जन जनवादी पार्टी | 91 |
| 8. | श्रीधर विठोबा गडलींगजय | हिंद जय भारत राष्ट्रीय पार्टी | 69 |
| 9. | सुरज निरंजन लांडगे | आंबेडकरीस्ट रिपब्लिकन पार्टी | 148 |
| 10. | संदेश सुर्यभानजी मेश्राम | रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) | 201 |
| 11. | हर्षवर्धन बळीराम खेब्रागडे | बहूजन महा पार्टी | 71 |
| 12. | अब्दुल कय्युम अब्दुल गणी | अपक्ष | 203 |
| 13. | कमलसिंग विजयसिंह चितोडिया | अपक्ष | 268 |
| 14. | राजेश प्रल्हाद मानकर | अपक्ष | 434 |
| 15. | राजेश बळीराम वानखडे | अपक्ष | 346 |
| 16. | वनदेव माणिकराव मोहोड | अपक्ष | 304 |

| | |
|---|---|
| एकूण | 202328 |
| नोटा | 635 |
| अवैध वोट | 208 |
| टेंडर वोट | 1 |

### 41-मेळघाट ( अ.ज. ) विधानसभा मतदारसंघ

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| 1. | केवलराव तुळशीराम काळे (विजयी) | भारतीय जनता पार्टी | 145978 |
| 2. | मोतीलाल बाटू ठाकरे | बहूजन समाज पार्टी | 1593 |
| 3. | डॉ. हेमंत नंदा चिमोटे | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | 39119 |
| 4. | राजकुमार दयाराम पटेल | प्रहर जनशक्ती पार्टी | 25281 |
| 5. | रामकिशोर कालुराम जांबु पटेल | आंबेडकराईट पार्टी ऑफ इंडिया | 533 |
| 6. | शैलेंद्र विजयराव गावंडे | नॅशनल वर्ल्ड लिडर पार्टी | 640 |
| 7. | ज्योती उत्तमराव सोळंके | अपक्ष | 794 |
| 8. | प्रविण रामु मावस्कर | अपक्ष | 213 |
| 9. | भारतीताई रवि बेठेकर | अपक्ष | 343 |
| 10. | महेंद्र किशोर पटेल | अपक्ष | 232 |
| 11. | रमेश भगवंतराव तोटे | अपक्ष | 2445 |
| 12. | राजाराम भुर्‍याजी भिलावेकर | अपक्ष | 558 |
| 13. | राजेश किसन दहिकर | अपक्ष | 655 |
| 14. | विनोद भैय्यालाल भिलावेकर | अपक्ष | 630 |
| 15. | हिरालाल गन्नु अखंडे | अपक्ष | 653 |

| | | | |
|---|---|---|---|
| नोटा | 2462 | अंतिम मतदार | 302029 |
| एकूण | 219667 | पुरूष मतदार | 154586 |
| अवैध वोट | 96 | स्त्री मतदार | 147432 |
| टेंडर वोट | 2 | इतर मतदार | 11 |

### 42- अचलपूर विधानसभा मतदारसंघ

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| 1. | अनिरुध्द उर्फ बबलुभाऊ सुभानराव देशमुख | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | 62791 |
| 2. | प्रविण वसंतराव तायडे | भारतीय जनता पार्टी | 78201 |
| 3. | रवि गुणवंतराव वानखडे | बहूजन समाज पार्टी | 495 |
| 4. | प्रदिप साहेबराव मानकर | वंचित बहूजन आघाडी | 558 |
| 5. | बच्चू बा. कडू | प्रहर जनशक्ती पार्टी | 66070 |
| 6. | राहूल कडू | आझाद समाज पार्टी (कांशी राम) | 543 |
| 7. | शिवचरण शंकरसा चेडे | पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटीक) | 89 |
| 8. | सुनिता राजेश हरडे | जन जनवादी पार्टी | 146 |
| 9. | अजिंक्य उर्फ भिकाजी दादाराव फाटे | अपक्ष | 135 |
| 10. | प्रा. अनिल मधुकरराव काळे | अपक्ष | 54 |
| 11. | अभ्यंकर सुनंदा जयराम | अपक्ष | 92 |
| 12. | गौरव ओमप्रकाश किटुकले | अपक्ष | 456 |
| 13. | प्रमोदसिंह गड्रेल ठाकूर | अपक्ष | 303 |
| 14. | निलेश दिपकपंत पवार | अपक्ष | 86 |
| 15. | मनोज सुरेश मोर्से | अपक्ष | 376 |
| 16. | मोहम्मद सीद्दीकी मोहम्मद सादीक | अपक्ष | 434 |
| 17. | मंगेश विठ्ठलराव बोरवार | अपक्ष | 560 |
| 18. | राजेश घनशाम सुंडेवाले | अपक्ष | 325 |
| 19. | रावसाहेब पुंडलीक गोंडाणे | अपक्ष | 97 |
| 20. | रुकसाना सैय्यद निसार | अपक्ष | 55 |
| 21. | वीकी दीलीपराव भोरगडे | अपक्ष | 371 |
| 22. | सतिश उत्तमराव इंगोले | अपक्ष | 137 |

| | |
|---|---|
| नोटा | 298 |
| एकूण | 212374 |
| अवैध वोट | 144 |
| टेंडर वोट | 2 |

### 40 दर्यापूर ( अ.जा. ) विधानसभा मतदारसंघ

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| 1. | कॅप्टन अभिजीत आनंद अडसुळ | शिव सेना | 23632 |
| 2. | गजानन मोतीराम लवटे | शिव सेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) | 87749 |
| 3. | प्रा. नागोराव वामनराव हंबडे | बहूजन समाज पार्टी | 1274 |
| 4. | अरुण मोतीरामजी वानखडे | प्रहर जनशक्ती पार्टी | 1877 |
| 5. | अकुश साहेबराव वाकपांजर | वंचित बहूजन आघाडी | 21263 |
| 6. | कैलाश दत्तमराव मोरे | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) | 368 |
| 7. | नाजुकराव यशवंतराव चौरपगार | पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) | 599 |
| 8. | रमेश गणपतराव बुंदिले | राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टी | 68040 |
| 9. | सुमित्रा साहेबराव गायकवाड | जन जनवादी पार्टी | 358 |
| 10. | कांचनमाला शिवकिरण वानखडे | अपक्ष | 208 |
| 11. | मनोहर अमृतराव चौथमल | अपक्ष | 206 |
| 12. | रविकिरण देविदास तेलगोटे | अपक्ष | 223 |
| 13. | ॲड.राजू मधुकरराव कलाने | अपक्ष | 262 |
| 14. | निलेश गजानन राक्षसकर | अपक्ष | 260 |
| 15. | डॉ. प्रा. सुजाता विश्वासराव आठवले | अपक्ष | 746 |
| 16. | ॲड. संजय रघुनाथ वानखेडे | अपक्ष | 482 |

| | |
|---|---|
| नोटा | 1003 |
| एकूण | 207547 |
| रिजेक्टेड वोट | 25 |
| टेंडर वोट | 4 |

# जल्लोष रॅलींनी दणाणले आठ ही मतदारसंघ

## गुलालाची उधळण, डिजेच्या तालावर थिरकले समर्थक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** - विधानसभा निवडणूकीतील विजयी उमेदवारांची 23 नोव्हेबर रोजी जिल्ह्यातील आठही मतदार संघात विजयी रॅली काढण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी गुलालाची उधळण, प्रचंड आतिषबाजी व डिजेच्या तालावर पदाधिकारी व कार्यकर्ते थिरकले. नवनिर्वाचित उमेदवार सुलभा खोडके यांच्या गाडगे नगर परिसर स्थित निवासस्थानी स्नेहीजन-हितचिंतक-कार्यकर्ते-पदाधिकारी-नारीशक्ती यांची अभिनंदन करण्यासाठी एकच रीघ लागली होती. तदनंतर एसटी डेपो ते अमरावती रेल्वे स्टेशन मार्ग परिसर स्थित सुलभाताई खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालयात या विजयोत्सवाचा भव्य व अभूतपूर्व जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी ढोल -ताश्यांचा गजर-गुलालाची उधळण-सामूहिक नृत्याचा फेर-वारे घडी-आयी रे घडी,महायुतीच्या ऐक्याचा विजय असो च्या घोषणा देण्यात आल्या. प्रत्येकाचे गळ्यात महायुतीच्या मित्र पक्षाचे दुपट्टे, डोक्यावर टोप्या घालून हातात झेंडे घेतले होते. महिलांचा नृत्याचा फेर सुरु होता. त्यानंतर सुलभा खोडके यांनी लोकशाही भवन येथे विजयी प्रमाणपत्र स्वीकारले.

## गुलालाने राजकमल माखला

बडनेरा मतदार संघात राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांना विजयी घोषित करून लोकशाही भवन येथे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. मतमोजणी निरीक्षक प्रांजल हजारिका, बडनेरा निवडणूक निर्णय अधिकारी विजय जाधव, क्रीडा उपसंचालक विजय संतान यांनी रवी राणा यांना प्रमाणपत्र बहाल करून त्यांच्या विजयाबद्दल अभिनंदन केले. या विजयानंतर आमदार रवि राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांच्यासह हजारो पदाधिकारी व कार्यकर्त्यांची रॅली शहरात काढण्यात आली. राजकमल चौकात प्रचंड गुलालाची उधळण करून जल्लोष करण्यात आला.

## जेसीबींवर काढली रॅली

मेळघाट मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे केवलराम काळे विजयी घोषित केल्यानंतर भाजप समर्थकांनी तिन जेसीबींवर काळे यांची विजयी मिरवणूक काढण्यात आली. शहरातुन निघालेले या विजयी उमेदवार काळे यांच्या मिरवणूकीत शहरातील नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. धारणी येथे झालेल्या मतमोजणी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी प्रियंमवदा म्हाडदळकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

## राजेश वानखडे यांची विजयी रॅली

तिवसा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार राजेश श्रीरामजी वानखडे यांना विजयी झाले. तिवसा येथे झालेल्या मतमोजणी मिन्नू पीएम निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी मतमोजणी निरीक्षक, सहाय्यक निवडणूक अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. राजेश वानखडे यांची विजयाची रॅली तिवसा शहरात काढण्यात आली. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ता तथा नागरिकांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. अनेक गणमान्य नागरिकांनी राजेश वानखडेंची भेट घेऊन, त्यांचे अभिनंदन केले.

## मोर्शीत यावलकर यांची रॅली

मोर्शी विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे उमेदवार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी दणदणीत विजय संपादन केला. मतमोजणी पूर्णपणे पार पडल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी प्रदीप पवार यांच्या हस्ते मोर्शी विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार उमेश उर्फ चंदूभाऊ यावलकर यांना सर्टिफिकेट व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत न भूतो न भविष्यती विजयी रॅली काढण्यात आली. ही रॅली स्थानिक शिवाजी चौक मार्गे जयस्तंभ चौक ते रामजीबाबा मंदिर चौक परिसरात रॅलीची सांगता करण्यात आली. यावेळी सर्व जाती धर्मातील नागरिकांनी महिला भगिनींनी गगनभेदी घोषणा देऊन व गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर व ठाणेदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नसून मतदान मोजणी शांततेत पार पडली.

## गजानन लवटेंची विजयी रॅली

दर्यापूर मतदारसंघात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार गजानन मोतीराम लवटे विजयी झाले. दर्यापूर येथे मतमोजणी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी राजेश्वर हांडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. त्यानंतर दर्यापूरात गजानन लवटे यांची रॅली काढण्यात आली. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड जोश संचारला होता.

# 143 उमेदवारांचे डिपॉझिट जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 23 )** - जिल्ह्यातील 8 मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीत नशीब आजमावलेल्या 160 उमेदवारांपैकी केवळ 17 उमेदवारांना त्यांची अनामत रक्कम वाचवण्यात यश आले आहे. तर उर्वरित 143 उमेदवारांची अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे.



डिपॉझिट वाचवण्यासाठी उमेदवाराला एकूण वैध मतांपैकी 1/6 म्हणजेच 16.66त्न मते मिळवावी लागतील. त्यात अमरावती आणि अचलपूर मतदारसंघातील प्रत्येकी 3 उमेदवार सुरक्षा ठेव वाचविण्यात यशस्वी ठरले. तर बडनेरा, धामणगाव रेल्वे, तिवसा, मेळघाट, दर्यापूर मतदारसंघात केवळ विजयी उमेदवार व दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराचे अनामत रक्कम वाचली. मात्र मोर्शी मतदारसंघात विजयी वगळता एकाही उमेदवाराला अनामत रक्कम वाचवता आली नाही.

## या उमेदवारांनी अनामत रक्कम बचावली

अनामत रक्कम वाचवणार्यांमध्ये सुलभा खोडके, डॉ.सुनील देशमुख, डॉ.अलीम पटेल, रवी राणा, प्रीती बंड, प्रवीण तायडे, बच्चू कडू, बबलू देशमुख, प्रताप अडसड, प्रा.वीरेंद्र जगताप, राजेश वानखडे, यशोमती ठाकूर, उमेश यावलकर, देवेंद्र भुयार, केवलराम काळे, डॉ.हेमंत चिमोटे, गजानन लवटे, रमेश बुंदिले आदींचा समावेश आहे. निवडणूक लढवताना उमेदवाराला एक रक्कम जमा करावी लागते, ज्याला सुरक्षा ठेव म्हणतात. विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी 10,000 रुपये आणि अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी 5,000 रुपये सुरक्षा ठेव जमा करण्यात आली होती.

# कमी दाबाचा वीजपुरवठ्याला चुरणीवासी हैराण

## पाणी पुरवठाही विस्कळीत

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.23 )** – चिखलदरा तालुक्यातील हतरु, चुरणी, काटकुंभ, परिसरातील मागील दहा ते पंधरा दिवसापासून कमी दाबाचा वीज पुरवठा होत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांचे सुद्धा मोठे नुकसान होत आहे. यासह या भागातील पाणीपुरवठा सुद्धा सुरळीत होत नसल्यामुळे नागरिकांना हात पंपावरुन पाणी आणावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांचा संपूर्ण दिवस पाणी आणण्यात जात आहे. सध्या रब्बीच्या पिकांची पेरणी सुरू आहे. मात्र वेळेवर शेतीला सुद्धा पाणी मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे हाल होत आहेत, अनेक शेतकऱ्यांनी गव्हाची पेरणी केली आहे. मात्र पाणी मिळत नसल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक ठिकाणी गहू वाळण्याच्या स्थितीत आला आहे. अशी गंभीर परिस्थिती असताना वीज वितरण कंपनीने या गोष्टीकडे लक्ष देऊन या भागातील वीज पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच या भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुद्धा सुरळीत होत नसल्यामुळे या भागातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. चुरणी गावातील पाणीपुरवठा दहा ते पंधरा दिवसापासून बंद आहे.



### ओव्हरलोड मुळे तारा तुटतात

चुरणी, जारिदा या भागातील विद्युत पुरवठा मध्यप्रदेशातुन आलेली आहे. 200 किलोमीटर अंतरावरुन विद्युत पुरवठा आलेली आहे. या सीजनमध्ये शेतीचे पंपिंग व इतर पंपिंग मोठ्या प्रमाणात असते, त्यामुळे लोड वाढतो. ओव्हर लोडमुळे अनेकदा तारा तुटतात. त्या शोधण्यासाठी खूप वेळ लागतो.या कारणाने बऱ्याचदा वीज पुरवठा बंद असतो. जारिदा या ठिकाणी सब सेंटर बनवून तयार आहे, परंतु वन विभागाच्या परवानगीमुळे हे सब सेंटर सुरु झालेले नाही. हे सब सेंटर सुरु झाले तर या समस्या सुटेतील अशी प्रतिक्रिया एका वीज वितरण कंपनीच्या एका अधिकाऱ्याने दिली.

गेल्या कित्येक दिवसापासून चुरणी, हतरु मध्ये वीज पुरवठ्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या शेतात पेरलेले गहु, हरभऱ्याला पाणी न भेटल्यामूळे हे वाळत आहे. हे अपुऱ्या वीजपुरवठ्यामूळे होत आहे.

**रुपेश भक्ते, नागरिक, चुरणी.**

चुरणी ग्रामपंचायतमध्ये सचिव आणि सरपंच यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. सचिव तुरकाने हे महिनाभर बेपत्ता असतात. महिन्यातून एक दिवस ग्रामपंचायतमध्ये येतात मासिक सभा घेतात आणि दुसऱ्या दिवशी गावाकडे निघून जातात. चुरणी गावाचा पंधरा दिवसापासून पाणीपुरवठा बंद आहे. गावातील नागरिकांना सचिव आणि सरपंच यांच्या मुळे खुप मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

**मनिष येवले, नागरिक, चुरणी.**

वीज विभागाच्या गलथान कारभारामुळे मागील दोन वर्षांपासून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. तरी वीज वितरण कंपनीने याकडे विशेष लक्ष देत, शेतकऱ्यांना होत असलेल्या मानसिक त्रासापासून मुक्ती द्यावी.

**नरेंद्र टाले, शेतकरी, चुरणी.**

| 43- मोर्शी विधानसभा मतदारसंघ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते |
| 1. | उमेश उर्फ चंदू आत्मारामजी यावलकर | भारतीय जनता पार्टी | 99683 |
| 2. | कमलनारायण जानराव उईके | बहूजन समाज पार्टी | 4122 |
| 3. | गिरीश रंगराव कराळे | नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार | 31843 |
| 4. | देवेंद्र महादेवराव भुयार | नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी | 34695 |
| 5. | गोपाल ज्ञानेश्वरराव बेलसेरे | हिंदराष्ट्र संघ | 323 |
| 6. | जफर खान फते खान | वंचित बहूजन आघाडी | 759 |
| 7. | रवि (भाऊ) मोतीराम सिरसाम | विकास इंडिया पार्टी | 236 |
| 8. | ॲड. राजू बक्षी जामनेकर | जन जनवादी पार्टी | 230 |
| 9. | रामराव बाजीराव घोडसकर | ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक | 102 |
| 10. | सुखदेव ब्रिजलाला उईके | गोंडवाना गणतंत्र पार्टी | 494 |
| 11. | सुशिल सुरेशराव बेले | आझाद समाज पार्टी (कांशी राम) | 4052 |
| 12. | उमेश प्रल्हादराव शहाणे | अपक्ष | 906 |
| 13. | जगदिश उध्दवराव वानखडे | अपक्ष | 601 |
| 14. | प्रमोद सुभाषराव कडू | अपक्ष | 1032 |
| 15. | प्रविण रमेशराव वानखडे | अपक्ष | 346 |
| 16. | राजू नानाजी फुके | अपक्ष | 1020 |
| 17. | विक्रम नरेशचंद्रजी ठाकरे | अपक्ष | 26729 |
| 18. | विपूल नामदेवराव भडांगे | अपक्ष | 645 |
| 19. | सुहासराव विठ्ठलराव ठाकरे | अपक्ष | 1493 |

| | |
|---|---|
| नोटा | 758 |
| एकूण | 209311 |
| रिजेक्टेड वोट | 646 |
| टेंडर वोट | 4 |

# धामणगाव विधानसभा निवडणुकीत भाजपाची कॉंग्रेसला दुसऱ्यांदा धोबीपछाड

## प्रताप अडसड 16 हजार 228 मतांनी विजयी वीरेंद्र जगताप यांचा पराभव



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि. 23 )**– धामणगाव रेल्वे मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार प्रताप अरुणभाऊ अडसड हे 16 हजार 228 मतांनी विजयी झाले. चांदूर रेल्वे येथे मतमोजणी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी तेजश्री कोरे यांच्या हस्ते आ. प्रताप अडसड यांना प्रमाणपत्र देण्यात आले. धक्कादायक मतदार संघ म्हणून परिचीत असलेल्या धामणगाव मतदार संघात दुसऱ्यांदा भाजपाचे प्रताप अरूण अडसड यांनी कॉंग्रेसचे प्रा.वीरेंद्र जगताप यांचा पराभव करून मतदार संघावर भगवा फडकविला आहे. या मतदार संघात भाजप व कॉंग्रेस यांच्यात सरळ लढत झाली असुन भाजपाने कॉंग्रेसला धोबीपछाड दिली आहे. तर वंचित बहुजन आघाडीचे डॉ. निलेश विश्वकर्मा हे मागील निवडणुकीचा जलवा कायम राखण्यात अपयशी ठरले असुन त्यांना 9 हजार 784 मतांवर समाधान मानावे लागले आहे. या निवडणुकीत भाजपचे प्रताप अडसड यांना 1 लाख 10 हजार 641 मते मिळाली. तर त्यांचे कट्टर प्रतिस्पर्धी कॉंग्रेसचे प्रा. वीरेंद्र जगताप यांना 94 हजार 413 मते मिळाली.

अत्यंत अटीतटीच्या झालेल्या सरळ लढतीत पहिल्या फेरीपासून भाजपचे प्रताप अडसड यांनी आघाडी घेतली होती. ती शेवट च्याफेरीपर्यंत कायम होती. त्यामुळे कॉंग्रेसला सुरूवातीपासून धाकधूक होती. खुद्द प्रा. वीरेंद्र जगताप मतगणणा केंद्रावर उपस्थित होते. शेवटी पराभव स्पष्ट दिसत असल्याने त्यांनी मतगणणा केंद्र सोडले. विजयानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी फटाक्याच्या आतिषबाजीत आमदार प्रताप अडसड यांची डीजे च्या गजरात चांदूर रेल्वे शहरातून विजयी मिरवणुक काढली. यावेळी 4 जेसीपीतून त्यांच्यावर फुलांचा वर्षाव व गुलालाची उधळण करण्यात आली. ठिकठिकाणी त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. या विजयाचा जल्लोष संपूर्ण मतदारसंघात होतांना दिसत होता. या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून एसडीओ तेजश्री कोरे, सहाय्यक म्हणून तहसीलदार पूजा माटोडे (चांदूर रेल्वे), तहसीलदार अभय घोरपडे (धामणगाव रेल्वे) व तहसीलदार अश्विनी जाधव (नांदगाव खंडेश्वर) यांच्यासह सर्व महसुल कर्मचाऱ्यांनी चोख काम बजावले. चांदूर रेल्वेचे पोलिस अधिकाऱ्यांसह सर्व पोलीस कर्मचारी, होमगार्ड, जवानांनी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवली होती.

### मीडिया सेंटरवर पत्रकारांना मोबाईल नेण्यासाठी मज्जाव

धामणगाव विधान सभा निवडणुकीचे मतगणणा केंद्रावर निवडणुकीची माहिती घेण्यासाठी पत्रकारांनी रितसर ओळखपत्र बनविले होते. निवडणुकीचे अपडेट पाठविण्यासाठी मोबाईल आवश्यक असतांना त्यांना मोबाईल घेऊन जाण्यासाठी मज्जाव करण्यात आला. यावेळी पत्रकारांनी थेट वरिष्ठांशी संपर्क साधल्यानंतर एसडिओ तेजश्री कोरे यांनी पत्रकारांना मीडिया सेंटरवर मोबाईल घेऊन जाण्याची परवानगी दिली. त्यानंतरही एकदा पत्रकार मतदार केंद्राच्या आत गेल्यानंतर त्यांना परत बाहेर जाता येणार नाही अश्या जाचक अटी टाकल्याने सर्व पत्रकारांनी प्रचंड रोष व्यक्त केल्यानंतर अट शिथील केली. या सर्व प्रकाराचा पत्रकारांनी तिव्र रोष व्यक्त केला.

### 138 मत रिजेक्ट

धामणगाव मतदार संघात 20 नोव्हेंबरला झालेल्या मतदानात 1 लाख 60 हजार 408 पुरूषांपैकी 1 लाख 17 हजार 222 पुरूषांनी मतदानाचा हक्क बजावला. तर 1 लाख 57 हजार 446 महिलांपैकी 1 लाख 4 हजार 497 महिलांनी मतदान केले. म्हणजेच एकुण 3 लाख 17 हजार 856 मतदारांपैकी पोस्टल बॅलेटसह एकुण 2 लाख 22 हजार 575 मतदारांनी मतदानाचे कर्तव्य बजावले होते. यापैकी टेंडर (प्रदत्त) मतदान 8 झाले तर 138 मत रिजेक्ट झाले आहे.



### 'अबकी बार मुस्लिम आमदार' थोडक्यात हुकले!

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.23 )**– आझाद समाज पार्टी (कांशीराम) चे अलीम पटेल मो. वहीम यांनी 54591 मते घेत 'अबकी बार मुस्लिम आमदार' ची आशा थोडक्यात हुकली. अलिम पटेल यांचे 'किटली' हे बोधचिन्ह मुस्लिम बहुल परिसरात प्रचंड प्रमाणात लोकप्रिय झाले होते. त्यामूळे त्यांनी प्रस्थापित आमदार सुलभा खोडके यांना ओव्हरटेक करित अलिम पटेल थेट विजयाचा समिप पोहोचले होते. परंतू सुलभा खोडके आणि सुनिल देशमुख यांनी अलिम पटेल यांना ओव्हरटेक केले. अखेर सुलभा खोडके विजयी झाला.

| 36- धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पक्ष | मिळालेली मते |
| 1. | प्रताप अरूणभाऊ अडसड | भारतीय जनता पार्टी | 110641 |
| 2. | विरेंद्र वाल्मीकराव जगताप | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | 94413 |
| 3. | योगेंद्र एकनाथ पाटील | बहुजन समाज पार्टी | 1326 |
| 4. | अनिल भाऊराव कांबळे | नकी भारतीय एकता पार्टी | 171 |
| 5. | अक्षय कुमार | आंबेडकरिस्ट रिपब्लिकन पार्टी | 159 |
| 6. | गौवर किरण राहटे | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) | 78 |
| 7. | दिपक पुंडलिक आकोडे | जय हिंद जय भारत राष्ट्रीय पार्टी | 88 |
| 8. | निलम देविदासजी रंगारकर | देश जनहित पार्टी | 118 |
| 9. | डॉ. निलेश ताराचंद विश्वकर्मा | वंचित बहुजन आघाडी | 9784 |
| 10. | प्रविण निलकंठ हेडवे | प्रहर जनशक्ती पार्टी | 1155 |
| 11. | फिरोज खॉ पठान | ऑल इंडिया मजलिस-ए-एन्कलाब-ए-मिल्लत | 114 |
| 12. | विकी दयाराम मुंडे | जन जनवादी पार्टी | 83 |
| 13. | विजय रमेशराव खोब्रागडे | राष्ट्रीय गोंडवाना पार्टी | 143 |
| 14. | सुनीता रायबोले | पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटीक) | 140 |
| 15. | हर्षवर्धन बळीराम खोब्रागडे | बहुजन महा पार्टी | 404 |
| 16. | अभिलाषा चंद्रशेखर गजभिये | अपक्ष | 722 |
| 17. | अमोल प्रभाकर विरे | अपक्ष | 1032 |
| 18. | गजानन ज्ञानेश्वर चांदुरकर | अपक्ष | 607 |
| 19. | अनिल उध्दवराव भोळे | अपक्ष | 177 |
| 20. | राजेश बाबाराव भोयर | अपक्ष | 170 |
| 21. | विजय शंकर रामटेके | अपक्ष | 148 |
| 22. | विजय शामराव शेंडे | अपक्ष | 137 |
| 23. | संदिप कृष्णराव वाट | अपक्ष | 567 |
| 24. | स्वप्नील जयकुमार खडसे | अपक्ष | 198 |

| | |
|---|---|
| नोटा | 168 |
| एकूण | 222575 |
| अवैध वोट | 138 |
| टेंडर वोट | 8 |

# चंदू यावलकर यांचा एकतर्फी विजय

## पाच वर्षानंतर मोर्शी मतदारसंघात पुन्ह कमळ फुलले ■ राष्ट्रवादीचे देवेंद्र भुयार दुसऱ्या स्थानावर





**महासागर प्रतिनिधी**

**वरुड/मोर्शी, ( दि.23 )** – मोर्शी विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे उमेदवार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी 1 लाख 1 हजार 500 मते प्राप्त करून दणदणीत विजय संपादन केला. त्यांनी 66,357 मतांचा लीड घेऊन एकतर्फी विजय मिळविला.

भाजपाचे चंदू उर्फ उमेश यावलकर यांच्या विजयाची घोषणा होताच कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष साजरा केला. यावलकर यांच्या विजयाची मिरवणूक राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या निवासस्थानापासून ते बसस्थानक मार्गे नवनिर्वाचित आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांच्या घरापर्यंत काढण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून उमेश यावलकर यांच्या विजयाचा आनंद साजरा केला.

या निवडणुकीत अजित पवार राष्ट्रवादी गटाचे विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांना 35,143 मते, शरद पवार राष्ट्रवादी गटाचे गिरीश कराळे यांना 33 हजार 149 मते तर अपक्ष विक्रम नरेशचंद्र ठाकरे यांना 26,624 मतांवर समाधान मानावे लागले. आज दि.23 नोव्हेंबर रोजी शासकीय धान्य गोदाम येथे सकाळी 7 वाजता निवडणूक निर्णय अधिकारी प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनात मतमोजणीला सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम पोस्टल मते मोजण्यात आली असतांना उमेश उर्फ चंदू यावलकर यांना 2300 मते, देवेंद्र भुयार यांना 650 मते,गिरीश कराळे यांना 1700 मते तर विक्रम ठाकरे यांना 150 मते पोस्टलची प्राप्त झाली.त्यानंतर मतदान केंद्रनिहाय फेऱ्या सुरू करण्यात आल्यानंतर उमेश यावलकर यांना 23 फेऱ्यापर्यंत लीड वाढतच होती. 311 मतदान केंद्रावर पार पडलेल्या मतदानापैकी 300 मतदान केंद्रावर उमेश यावलकर यांना अधिक मते प्राप्त झाली. केवळ 11 मतदान केंद्रावर उमेश यावलकर यांना अगदी कमी मते प्राप्त झाली. निवडणुकीची मतमोजणी पूर्णपणे पार पडल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी प्रदीप पवार यांच्या हस्ते मोर्शी विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांना सर्टिफिकेट व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. दरम्यान हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत 'न भूतो न भविष्यती' विजयी रॅली काढण्यात आली. ही रॅली स्थानिक शिवाजी चौक मार्गे जयस्तंभ चौक ते रामजीबाबा मंदिर चौक परिसरात रॅलीची सांगता करण्यात आली. यावेळी सर्व जाती धर्मातील नागरिकांनी महिला भगिनींनी गगनभेदी घोषणा देऊन व गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर व ठाणेदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नसून मतदान मोजणी शांततेत पार पडली..

### यावलकर यांचा विक्रम

वरुड, मोर्शी विधानसभेची निवडणूक सुरू झाली, तेव्हापासूनच भारतीय जनता पार्टीचा उमेदवार हा निवडून येणार हे जवळपास मतदार संघातील जनता सांगत होती. परंतु किती मताने निवडून येणार हे कोणीही सांगू शकत नव्हते. चार उमेदवार रिंगणात असल्यामुळे पाच ते दहा हजाराच्या फरकाने भाजपाचा उमेदवार निवडून येईल असे वाटत असताना ते 64,707 मतांनी निवडून आले. हा यावलकर यांचा विक्रमच म्हणावा लागेल.

### यावलकरांची आघाडी विरोधकांसाठी चिंतेचा विषय

निवडणूक मतमोजणीला सुरुवात झाली असून पोस्टल बॅलेट पासून चंदू उर्फ व उमेश यावलकर हे आघाडीवरच होते, सुरुवातीला ते 2167 मतांनी आघाडीवर होते. त्यामुळे यावलकर यांची आघाडी कमी होईल असे वाटत होते. परंतु ती कमी न होता वाढतच गेली आणि 99 हजार 200 मते घेऊन विरोधकावर 64 हजार 707 मतांनी मात केली ही अभूतपूर्व आघाडी विरोधकांसाठी चिंतेचा विषय ठरली आहे.

# जिल्ह्यात 7472 मतदारांची नोटाला पसंती

## मेळघाट मतदारसंघात सर्वाधिक 2462




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** – विधानसभा निवडणुकीच्या निकालात जिल्ह्यातील अनेक जागांवर अनपेक्षित निकाल लागले आहेत. त्याचप्रमाणे ईव्हीएमवर नन ऑफ द अबॉव्ह (नोटा) वोट बटण दाबणाऱ्यांची संख्याही कमी नव्हती. जिल्ह्यातील 8 मतदारसंघातील एकूण 7 हजार 472 मतदारांनी नोटा बटण दाबून सर्व उमेदवारांना नाकारले. त्यापैकी सर्वाधिक 2462 मतदान मेळघाट मतदारसंघात झाले. तर अमरावती मतदारसंघात 856, बडनेरा मतदारसंघात 692, अचलपूर मतदारसंघात 298, दर्यापूर मतदारसंघात 1003, धामणगाव रेल्वे मतदारसंघात 768, मोर्शी मतदारसंघात 758 आणि तिवसा मतदारसंघात 635 मतदारांनी नोटा बटण दाबले.

2019 च्या विधानसभा निवडणुकीत 109 उमेदवार रिंगणात होते. यामध्ये एकूण 66 टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मात्र 12,668 मतदारांनी यापैकी एकही उमेदवार पसंत केला नाही. त्यामुळेच त्यांनी नोटा%चा पर्याय वापरला.

**मतदार संघनिहाय**

| मतदार संघ | नोटा | अवैध |
|---|---|---|
| अमरावती | 856 | 198 |
| अचलपूर | 298 | 144 |
| बडनेरा | 692 | 00 |
| मेळघाट | 2462 | 96 |
| तिवसा | 635 | 208 |
| दर्यापूर | 1003 | 00 |
| मोर्शी | 758 | 00 |
| धामणगाव रेल्वे | 768 | 138 |